नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

# प्रेस नोट

**दिनांक ०१/०२/२०२२ (मंगळवार)**

**(दुपार)**

---

## शासकीय कामकाजात अळथळा निर्माण करणाऱ्या आरोपीतांना अटक

**पो.स्टे. बोरी** :—अंतर्गत १० कि.मी अंतरावरील मौजा आसोला सावंगी येथे दिनांक ०१/०२/२०२२ चे ००.३० वा. ते ०१.०० वा. दरम्यान फिर्यादी यांना मिळालेल्या माहीतीवरून कॅफे लिओ पोल या ठिकाणी जाउन शाहनीशा केली असता आरोपी क्र. १. नयन दादाजी चितलवार, वय ४७ वर्ष, रा. विश्वकर्मा नगर प्लॉट नं २६, नागपूर, २. अभिषेक नयन चिंतलवार, वय २६ वर्ष, रा. विश्वकर्मा नगर, प्लॉट नं २६ नागपूर व ३. विजय लक्ष्मणराव चरडे, वय ४५ वर्ष, रा. मानेवाडा नागपुर हे सदर बियर बार मध्ये मोठ—मोठयाने गाणे वाजवत होते तसेच आरडा ओरड करीत असतांना दिसले. त्यादरम्यान फिर्यादी हे आरोपीतांना विचारपुस करीत असतांना आरोपीने फिर्यादी यांची गच्ची पकडुन त्यांना धक्का—बुक्की केली. तसेच आरोपीतांनी फिर्यादीला अश्लिल शिवीगाळ तसेच मारण्याची धमकी देवुन नियत्रंण कक्ष येथे फोन करून खोटी माहीती दिली. आरोपीतांनी फिर्यादी व स्टाफ यांच्याशी उज्जत घालुन सरकारी कामात अडथळा निर्माण केला.

सदर प्रकरणी सरतर्फ पोउपनी आशीष मोरखडे पोस्टे बोरी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे.बोरी येथे आरोपीविरुध्द कलम ३५३,३३२,५०४,५०६,१८२,१८८,२६९,३४ भादंवी. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. सदर आरोपीतांना अटक करण्यात आली असून गुन्हयाचा पुढील तपास सपोनी श्री साखरकर मो. क्र. ७३५०९०२१०० हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**